आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे कार्यक्रम

- महाराष्ट्रात मालवण इथं छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणाच्या चौकशीसाठी संयुक्त तज्ञसमिती नेमण्याचा राज्यसरकारचा निर्णय
- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी
- आंध्रप्रदेशात विशाखापट्ट्णम इथं पाकिस्तानच्या हेरगिरीप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे देशभरात विविध ठिकाणी छापे

**आणि**

- टेलिग्राम एपचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पॉवेल दुरोव्ह यांची जामीनावर सुटका

**<><><><><>**

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा होत आहे. केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदानावर ध्यानचंद यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. सर्वांनी आपापल्या रोजच्या कामातून वेळ काढून किमान एक तास काढून, आपल्या आवडीचा एक खेळ खेळावा, असं आवाहन मांडवीय यांनी केलं .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात, मेजर ध्यानचंद यांना अभिवादन केलं आहे. खेळाबद्दल आत्मियता

बाळगणाऱ्या आणि क्रीडाक्षेत्रात देशाचं नाव उंचावणाऱ्या सर्वांचं कौतुक करण्याचा हा दिवस असल्याचं ते म्हणाले. अधिकाधिक युवकांना खेळण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मालवण इथं राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणाच्या चौकशीसाठी संयुक्त तज्ञसमिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. या समितीत बांधकाम अभियंते, आयाआयटी मुंबईचे प्रतिनिधी, तसंच नौदलाच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. याखेरीज राजकोटमधेच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा नव्याने उभारण्यासाठी देशातले नामवंत शिल्पकार, अभियंते, तज्ञ आणि नौदलाचे प्रतिनिधी यांची तज्ञ समिती नेमण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहेत.

**<><><><><>**

मुंबईच्या वांद्रे टर्मिनस पासून मडगावला जाणारी नवी एक्सप्रेस गाडी आजपासून सुरू होत आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल, केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या गाडीला हिरवा झेंडा दाखवून ही गाडी रवाना होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोग - युपीएससीला उमेदवारांची ओळख पडताळण्यासाठी आधार आधारित प्रमाणीकरण करण्याची परवानगी केंद्रसरकारने दिली आहे. परीक्षेसाठी नोंदणी करताना तसंच परिक्षेच्या विविध टप्प्यावर

आयोगाला हे प्रमाणीकरण करता येईल. बडतर्फ प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांनी खोटी माहिती दाखवून अनेक वेळा युपीएससीची परीक्षा दिल्याच्या प्रकरणानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे येत्या १ सप्टेंबरला सीडीएस म्हणजेच संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा आयोजित करण्यात आली असून ही परीक्षा सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते २ आणि ३ ते ५ या वेळेत घेण्यात येईल. तर एनडीए परीक्षा सकाळी १० ते साडेबारा आणि दुपारी २ ते साडेचार या वेळेत घेण्यात येईल.

<><><><><>

जुन्या प्रदूषणकारी व्यवसायिक तसंच प्रवासी गाड्या भंगारात काढून त्याजागी नव्या कमी प्रदुषणकारी गाड्या घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने काल दिल्लीत महत्त्वाची बैठक पार पडली. भारत मंडपम् इथं काल झालेल्या बैठकीत रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी भारतीय स्वयंचलित वाहन निर्माता सोसायटीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधला. यावेळी रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा आणि अजय टमटा उपस्थित होते. देशभरातून भंगार गाड्या टप्प्याटप्प्यानं बाद करण्यासाठी नवी प्रणाली राबवण्याच्या हेतूनं स्वयंसेवी पद्धतीने वाहनाचे आधुनिकीकरण कार्यक्रम किंवा वाहन भंगारात काढण्याचे नवे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. हे नवे धोरण नोंदणीकृत वाहन मोडीत काढण्याची सुविधा आणि स्वयंचलित चाचणी केंद्र यांच्या माध्यमातून राबवले जाईल.

<><><><><>

आंध्रप्रदेशात विशाखापट्ट्णम इथं पाकिस्तानच्या हेरगिरीप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने देशभरात विविध ठिकाणी छापे टाकले. गुजरात, कर्नाटक, केरळ, तेलंगण, उत्तरप्रदेश, बिहार, आणि हरयाणामधे मिळून १६ ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत २२ मोबाईल फोन्स, आणि  अनेक गोपनीय कागदपत्रं मिळाली असल्याचं एएनआयने सांगितलं. भारतीय नौदलासंबंधी महत्वाची आणि गोपनीय माहिती चोरणं आणि भारत विरोधी कारस्थान करणं या आरोपांखाली एनआयए ने गेल्यावर्षी दोन जणांवर आरोपपत्र दाखल केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. उमेदवारी अर्ज आजपासून येत्या ५ सप्टेंबरपर्यंत  भरता येतील. अर्जांची छाननी येत्या ६ सप्टेंबरला होणार असून उमेदवारी मागे घेण्याची मुदत ९ सप्टेंबरपर्यंत आहे. येत्या २५ सप्टेंबरला मतदान होणार आहे. जम्मू काश्मीर केंद्रशासित प्रदेशातल्या गंदेरबाल, श्रीनगर, बडगाम, राजौरी, पूँछ आणि रियासी या ६ जिल्ह्यात मिळून २६ मतदारसंघांमधे या टप्प्यात निवडणूक होणार आहे. सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

आपत्कालीन व्यवस्थापन क्षेत्रात सहकार्यासंबंधीची भारत आणि रशिया संयुक्त आयोगाची दुसरी बैठक काल रशियात मॉस्को इथं पार पडली. गृहराज्यमंत्री नित्यानंद राय भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करत आहेत. रशिया भेटीच्या पहिल्या दिवशी, २०२५-२६ या वर्षासाठी आपत्कालीन व्यवस्थापन क्षेत्रातल्या सहकार्यावर संयुक्त आयोगाच्या कार्य आराखडा तयार करण्यात आला. या

आराखड्यावर रशियाचे नागरी संरक्षण, आणीबाणी आणि नैसर्गिक आपत्तीच्या परिणाम निर्मूलन खात्याचे मंत्री कुरन्कोव्ह अलेक्झांडर व्याचेस्लाव्होविच आणि भारताचे गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><>**

अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत नोव्हाक जोकोविचने तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. आर्थर ॲशे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात त्यानं त्याच्याच देशाचा म्हणजेच सर्बियाच्या लास्लो जेरेचाचा ६-४, ६-४, २-० ने पराभव केला. जोकोविचचा पुढील सामना ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्सी पोपिरनशी होणार असून जोकोविचनं गेल्या वर्षभरात पोपरिनला तीन विविध स्पर्धांमध्ये पराभूत केलं आहे.

**<><><><>**

पॅरिस इथं काल दिव्यांगांसाठीच्या पॅराऑलिम्पिक्स क्रीडा महोत्सवाचं भव्य सोहळ्यात फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या हस्ते उद्घाटन झालं. या सोहळ्यात, १६७ देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४ हजार ४०० दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला. भारतीय चमूचं नेतृत्व सुमित अंतिल आणि भाग्यश्री जाधव यांनी केलं. पॅराऑलिम्पिकच्या या स्पर्धेत ८४ भारतीय दिव्यांग खेळाडू सहभागी होणार आहेत. भारताच्या दिव्यांग क्रीडा इतिहासातलं हा सर्वात मोठा चमू स्पर्धेत १२ खेळांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणार आहे. बॅडमिंटनमध्ये पुरुषांच्या एकेरीचे विजेतेपद राखण्यासाठी कृष्णा नागर प्रयत्नशील असेल तर अवनी लेखरा, मनीष नरवाल नेमबाजीचं लक्ष्य ठेवणार आहेत.

**<><><><>**

टेलिग्राम एपचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पॉवेल दुरोव्ह यांची जामीनावर सुटका झाली आहे. पॅरिसचे सरकारी वकील लॉर बेको यांनी सांगितलं की दुरोव्ह यांना पन्नास लाख युरो भरल्यावर जामीन मिळाला असून चौकशी पूर्ण होईपर्यंत फ्रान्समधून बाहेर जायला मनाई करण्यात आली आहे. टेलिग्राम माध्यमावर खंडणी, धाकदपटशा, विकृत मजकूर प्रसिद्ध करणे, दहशतवादाचं उदात्तीकरण करणे, अशा प्रकरचे गुन्हे करणाऱ्यांना अटकाव केला नसल्याचा आरोप दुरोव्ह यांच्यावर आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये दोन वेगवगेळ्या ठिकाणी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाल्याचं वृत्त आहे. कुपवाडा इथं दोन, तर तंगधार इथं एक दहशतवादी मारला गेला असून, अद्याप चकमक सुरु असल्याचं सुरक्षा दलानं सांगीतलं आहे.

**<><><><><>**

दिल्लीच्या काही भागात काल रात्री मध्यम ते तीव्र स्वरूपाचा पाऊस पडला असून गुजरातच्या सौराष्ट्र आणि कच्छ जिल्ह्यांमध्ये उद्यापर्यंत मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. तसंच गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, कोकण आणि गोव्यात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. बंगाल उपसागराच्या उत्तर आणि लगतच्या मध्य भागात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता असून पश्चिमेकडील ओडीसाच्या दक्षिणेकडे आणि आंध्र प्रदेशच्या उत्तरेकडे सरकण्याची शक्यता आहे. गुजरात आणि उत्तर महाराष्ट्र किनाऱ्यावर मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.